अग्रलेखांचा बादशहा नवा काळ

संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवा काळ

।। न मे भक्तः प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा बादशहा नवा काळ

# नौदल प्रमुखांचा बाणेदार राजीनामा

नौदलप्रमुख ॲडमिरल देवेंद्रकुमार जोशी यांनी सरकारच्या तोंडावर राजीनामा भिरकावून स्वत:चा आणि देशाचाही स्वाभिमान दाखवून दिला. मुंबई जवळच्या समुद्रात आयएनएस 'सिंधुरत्न' या पाणबुडीला झालेल्या अपघाताची नैतिक जबाबदारी स्वीकारून दिलेला राजीनामा म्हणजे संरक्षण दलामध्ये आणि एकूणच सार्वजनिक जीवनामध्ये आदर्शाची बूज राखणाराच म्हणावा लागेल. ही गोष्ट खरी आहे की, गेल्या सहा महिन्यांमध्ये नौदलामध्ये आठ अपघात घडले. गेल्याच महिन्यात मुंबईजवळच सिंधुघोष या पाणबुडीला आग लागून मोठा अपघात घडला होता आणि आता केवळ महिनाभराच्या अंतरात हा दुसरा अपघात घडल्यामुळे त्याविषयी निश्चितच चिंता व्यक्त होणे स्वाभाविक ठरते. सहा महिन्यात आठ अपघात ही संख्या लक्षात घेतली तर ते खरोखरच अपघात आहेत की घातपात आहेत. याचीदेखील चौकशी करण्याची गरज निर्माण होते. आता झालेल्या अपघातामुळे संरक्षण मंत्री ए.के.अँटोनी यांनी नौदल प्रमुखांकडे त्याचा खुलासा मागितला. त्यावेळेला नौदल प्रमुखांनी जे स्वाभिमानी उत्तर मंत्र्यांना ऐकवले. त्या वस्तुस्थितीचे गांभीर्य लक्षात घेतले तर संरक्षण मंत्र्यांनीच राजीनामा दिला पाहिजे. कारण जोशी यांनी मंत्र्यांना जे बाणेदार उत्तर ऐकवले आहे, ते उत्तरच नौदलाच्या सद्य परिस्थितीचा पंचनामा करण्यासारखे ठरते. २५ वर्षे जुन्या पाणबुड्या आम्ही वापरत असून आमच्याकडे खुलासा कसला मागता. या जुन्या पाणबुड्या तातडीने बदलल्या पाहिजेत. हे नौदल प्रमुखांचे सणसणीत उत्तर ऐकून ए.के अँटोनी निश्चितच चक्रावले असतील. अर्थात या उत्तरातून नौदल प्रमुख आपला बचाव करू शकत नाहीत. देवेंद्रकुमार जोशी हे एक अत्यंत कडक शिस्तीचे आणि उत्तम कर्तृत्व असलेले अधिकारी मानले जातात. नौदलातली त्यांची कारकिर्द त्यांच्यातल्या कडक शिस्तीमुळेच अधिक गाजलेली आहे. नौदलामध्ये जर एखाद्या अधिकाऱ्याकडून चूक झाली तर त्याची जबाबदारी त्या अधिकाऱ्याला स्वीकारायला लावून शिस्तीचे पालन केले जात असे. आता स्वत:कडूनच चूक झाल्याचे जोशी यांना जाणवले आणि म्हणून नैतिक जबाबदारी स्वीकारून त्यांनी राजीनामा देणे पसंत केले.आज मोठमोठ्या सरकारी कार्यालयांमध्ये अनेक प्रकारचे गैरव्यवहार किंवा अपघात होत असतात. परंतु कोणीही राजीनामा देण्याचा बाणेदारपणा दाखवत नाहीत. उलट आपण कसे निर्दोष आहोत असे दाखवण्याचा निर्लज्जपणा केला जातो. प्रशासनात किंवा सार्वजनिक जीवनात नैतिकतेचा ऱ्हास होत असताना नौदल प्रमुखांनी राजीनामा देण्याची ही घटना अत्यंत महत्त्वाची ठरते. देशाच्या तीन्ही संरक्षण दलांपैकी एका महत्त्वाच्या दलाचे प्रमुख तितक्याच निधड्या छातीने राजीनामा देण्याचा धारिष्ट्य दाखवतात ही गोष्ट सर्वांनाच विचार करायला लावणारी ठरते.

### राजीनाम्याने उपस्थित केलेले प्रश्न

प्रश्न एवढाच निर्माण होतो की नौदल प्रमुखांनी संरक्षणमंत्र्यांना जे खडे बोल सुनावले आहेत. ते त्यांनी यापूर्वीच का ऐकवले नाहीत. आपल्याकडे असलेल्या पाणबुड्या पंचवीस वर्षे जुन्या आहेत. देशाच्या संरक्षण सिध्दतेकरता इतक्या जुन्या खरे तर एका अर्थी टाकाऊ किंवा कालबाह्य झालेल्या पाणबुड्या वापरणे धोक्याचेच ठरते. अन्य देशांच्या नौदलामध्ये अत्याधुनिक पाणबुड्या दाखल होत असताना भारताकडे इतक्या वर्षांमध्ये त्या का येऊ शकल्या नाहीत? असाही मुद्दा उपस्थित होऊ शकतो. नौदलातली ही एवढी मोठी पोकळी किंवा त्रुटी तातडीने भरून काढली पाहिजे. असा आग्रह जोशी यांनी आपल्या कारकिर्दीत सरकारकडे का धरला नाही. यदाकदाचित सरकारकडे याबाबत त्यांनी यापूर्वी नाराजी व्यक्त केलेली असू शकेल. सरकारने त्यांच्या या नाराजीकडे दुर्लक्ष केल्यामुळेच जुन्या पाणबुड्या वापरण्याची वेळ नौदलावर आली. परंतु सरकार दुर्लक्ष करीत आहे आणि देशाच्या संरक्षणासाठी ते घातक आहे, हे लक्षात आणून देतानाच जोशींनी यापूर्वीच राजीनामा दिला असता तर तो अधिक प्रभावी ठरला असता. आतापर्यंत झालेले हे अपघात सरकारच्या नाकर्तेपणाचेच तर आहेतच. परंतु नौदलाप्रमुखांनी ज्या नाकर्तेपणाला तितकीच संधी दिली हे देखील नाकारता येत नाही. त्यांचा राजीनामा हा बाणेदारपणाचा निदर्शक तर आहेच आणि संरक्षण खात्याच्या बेजबाबदारपणावर बोट ठेवणारा असल्यामुळे तो तितकाच पाणीदारही आहे.सरकारने त्यांचा राजीनामा तातडीने स्वीकारला कारण संरक्षण खात्याला आणि संरक्षण मंत्र्यांना आपली आणखी बेअब्रू करून घ्यायची नव्हती. नौदल प्रमुख जोशींसारख्या कडक शिस्तीच्या अधिकाऱ्याचा बळी देऊन संरक्षण मंत्री आपला फार काळ बचाव करू शकत नाहीत. कारण त्यांच्या राजीनाम्याने संरक्षण खात्याचा कारभारही उघडा पडला आहे. आपला कर्तव्यदक्षपणा दाखवून जोशींनी आपली प्रतिष्ठा राखून घेतली. नौदलाची पतही यानिमित्ताने जपण्याचे काम त्यांनी केले. पण संरक्षणखात्याचे काय? तिथे सुरू असलेल्या अंदाधुंदी कारभाराचे उत्तर कोण देणार. हे प्रश्न या राजीनाम्याने उपस्थित केले आहेत.

### अपघात की घातपात

एक काळ असा होता की सरकारी विभागांमध्ये किंवा सार्वजनिक जीवनामध्ये नैतिक मूल्यांना अत्यंत महत्त्व दिले जात असे. रेल्वे अपघातामुळे राजीनामा देणारे लालबहाद्दूर शास्त्री यांची गोष्ट तर इतिहास विसरलेला नाही. परंतु त्यानंतर अशी नैतिकता कोणीही दाखवू शकलेला नाही. आपल्या पदांना आणि चिकटून राहण्याचा निर्लज्जपणाच जिकडे तिकडे पहायला मिळतो. उलट ज्यांच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप आहेत असे अधिकारी आपल्या खात्यात कसे राहतील असा प्रयत्न होत राहतो. सध्या पेट्रोलियम खात्याच्या सचिवांना मुदतवाढ देण्यासाठी पेट्रोलियम मंत्री मोईली यांनी अशीच अनैतिकता दाखवली. ज्या सचिवांविरुध्द आरोप आहेत त्यांच्यासाठी आग्रह धरणारे मंत्री तितकेच बेजबाबदार ठरतात. एवढेच नव्हे तर मुंबईवर झालेल्या दहशतवादी हल्ल्याच्यावेळी एकानेही राजीनामा देण्याचा बाणेदारपणा दाखवला नव्हता. शेवटी जनतेच्या दबावामुळे मुख्यमंत्री राज्याचे गृहमंत्री, आणि केंद्रीय गृहमंत्र्यांना नाईलाजाने राजीनामा द्यावा लागला होता. एकाही पोलीस अधिकाऱ्याने स्वत:हून राजीनामा देण्याचे नैतिक धाडस दाखवले नव्हते. एक गोष्ट मात्र खरी की त्या हल्ल्यापासून मुंबईतल्या नौदल विभागात काही ना काही अपघात घडत आहेत. त्याची ही वाढती संख्या घातपाताचा संशय निर्माण करणारी ठरते, त्याचीही चौकशी झाली पाहिजे.